सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा




## ▶▶ थोडक्यात...

### पैसे दे नाहीतर खल्लास करतो; महिलेला दिली धमकी

**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

रस्ता अडवून शिवीगाळ करुन पैसे दे नाहीतर डोक्यात मारून खल्लास करतो, अशी धमकी एका महिलेला बाळे येथे संजय उपाडे यांनी दिली. दरम्यान, काही लोक सोडवण्यासाठी आले असता, हातातील कुऱ्हाड फिरवत दहशत निर्माण केली. या दहशतीला घाबरुन सदर महिला घरात जाऊन दरवाजा लावून घेत असताना आरोपीने लाथ मारुन दरवाजा उघडला. आणि रोख रक्कम असलेले पाकीट जबरदस्तीने काढून घेतल्याची घटना घडली. यात हकीकत अशी की, दि.६ एप्रिल रोजी संजय उपाडे हा दारुच्या नशेत, हातात कुऱ्हाड घेऊन जगदेवी उर्फ संतोषी किसन गुंड (वय-५०, रा.संतोष नगर, बाळे, सोलापूर) यांचा रस्ता अडवून शिवीगाळ करुन त्यांना पैसे दे. नाहीतर डोक्यात मारुन खल्लास करतो, अशी धमकी दिली. त्यावेळी तिथे लोकांची गर्दी झाली, त्यातील काही लोक सोडवण्यासाठी आले असता, संजय उपाडे यांनी हातातील कुऱ्हाड हवेत फिरवत तुम्ही येथे थांबला तर एकालाही जिवंत सोडणार नाही सर्वांचे मुडदे पाडीन असे जोरात शिवी दिली. त्याच्या दहशतीला घाबरुन सर्वजण तेथून पळून गेले. जगदेवी उर्फ संतोषी गुंड या घाबरुन घरात जाऊन आतून दरवाजा लावत असताना संजय उपाडे याने लाथ मारुन दरवाजा उघडला व केस धरुन धाक दाखवून त्यांच्याकडील १७०० रुपये असलेले पाकीट जबरदस्तीने काढून घेतले व शिवीगाळ करुन यापुढे पैसे दिले नाही तर तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. याबाबत दि.१० एप्रिल रोजी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आला.

### हॅन्डल लॉक करुन ठेवलेली मोटरसायकल पळविली


**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

घरासमोर हॅन्डल लॉक करुन ठेवलेली मोटर सायकल चोरट्याने पळविल्याची घटना मुरारजी पेठ येथे घडली. युनूस इमाम मुल्ला (रा.अवंती नगर, मुरारजी पेठ, सोलापूर) यांनी एम.एच.१३ सी.एक्स.३७३४ या क्रमांकाची मोटरसायकल राहत्या घरासमोर हॅन्डल लॉक करुन ठेवली होती. दि.६ एप्रिल रोजी चोरट्याने सदर मोटरसायकल पळविली. याबाबत दि.१० एप्रिल फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली.

### 'समता-शाक्य'च्या वतीने महात्मा फुले यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त समता सैनिक दल आणि शाक्य




बहुउद्देशीय पोलिस अधिकारी-कर्मचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने अभिवादन करण्यात आले. यावेळी सुमित्रा जाधव, अंगद मुके, सुचित्रा थोरे, सुनीता गायकवाड, रेखा पात्रे, प्रीती जाधव, वर्षा जाधव, अनिल जगझाप, अरुण गायकवाड, विठ्ठल थोरे, प्रमोद जाधव, बाळासाहेब मस्के, शशांक तळभंडारे, संभाजी तळभंडारे, रत्नदीप कांबळे, मुकुंद चंदनशिवे, चंद्रकांत कोळेकर, शांतीकुमार कांबळे, अंकुश बनसोडे, पद्मराज तळभंडारे, विनोद जाधव, सुरज प्रक्षाळे, सम्राट प्रक्षाळे, सविजेता जाधव उपस्थित होते.

### १९ एप्रिलपासून सोलापुरात गंमत बालनाट्य शिबीर

**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

मुलां-मुलींच्या कलागुणांना वाव देण्याच्या अनुषंगाने समर्पित नाट्य शाळेच्या वतीने दि.१५ ते ३० एप्रिल या कालावधीत गंमत बालनाट्य शिबीराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती




सिने-नाट्य अभिनेते अमीर तडळवळकर व अश्विनी तडवळकर यांनी दिली. या शिबीरांतर्गत नाटकाचा इतिहास, नाटकाचे प्रकार, अभिनय म्हणजे काय? गुड टच बॅड टच याचा अर्थ, व्यक्तिरेखांचा वेध, रंगमंच तंत्र दिग्दर्शन, लेखन, कॅमेरा फेसिंग आदींविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रत्यक्ष रंगमंचावर अविष्कार यांसह पुरस्कार वितरण असे कार्यक्रमही यानिमित्ताने घेतले जाणार आहे. यात सहभागी होण्यासाठी ९९२१९०७६४२ या मोबाईल नंबरवर नावनोंदणी करावी, असेही त्यांनी सांगितले.

# सुधारित पाणीपुरवठा योजना; तीन महिन्यात काम सुरु होणार

- १३७८ कोटी रुपयांच्या खर्चाच्या महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा प्रकल्प
- कोणताही नवीन कर लागू न करता वसुली वाढविण्यावर भर

### मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ एप्रिल-**

शहरात १३७८.४२ कोटी रुपये खर्चाच्या महत्त्वाकांक्षी सुधारित पाणीपुरवठा प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम येत्या दोन ते तीन महिन्यांत सुरु करण्याचे नियोजन आहे. आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया वेगाने पूर्ण केल्या जातील. कोणताही नवीन कर लागू न करता सध्या असलेली सुमारे ७५ टक्के कर वसुली वाढवून ती ९५ टक्क्यांपर्यंत नेण्यावर भर दिला जाणार आहे, ज्यामुळे महसुलात लक्षणीय वाढ होऊन प्रकल्पासाठी आवश्यक आर्थिक तरतूद अधिक सक्षमपणे करता येणार असल्याची चर्चा बैठकीत झाली.



महापालिकेच्या वतीने महाराष्ट्र नागरी जलपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सोलापूर शहर सुधारित पाणीपुरवठा योजनेचा आढावा आज महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे आयोजित बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री यांचे आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मित्राचे (MITR) चे प्रवीण परदेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते, आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, मुख्यलेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, उपायुक्त आशिष लोकरे, मित्राचे संशोधन अधिकारी श्रुतीका पाटडे, वरिष्ठ जलतज्ज्ञ, जागतिक बँकचे श्रीनिवास पोडिपिरेड्डी, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यकटेश चौबे यांची प्रमुख उपस्थिती होती. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार २०३० ते २०६० या कालावधीतील पाणी मागणी, उपलब्धता आणि वितरण व्यवस्थेतील त्रुटी यावर चर्चा करण्यात आली.सध्या सोलापूर शहराला उजनी धरणासह विविध स्त्रोतांद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. सुमारे २७७.५० एमएलडी पाणी उपलब्ध आहे. मात्र, जलशुध्दीकरण क्षमता पुरेशी असतानाही वितरण व्यवस्था जुनी व अपुरी असल्याने संपूर्ण शहराला प्रभावी पाणीपुरवठा करणे शक्य होत नसल्याचे निदर्शनास आले. या प्रकल्पाच्या आर्थिक रचनेत महानगरपालिकेचा २५ टक्के हिस्सा, केंद्र शासनाचा २५ टक्के निधी व जागतिक बँकेचे ५० टक्के सहाय्य प्रस्तावित आहे.

तसेच, पाणीपट्टी व मालमत्ता कर प्रणालीत सुधारणा करून महसूल वाढविण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते मुख्यमंत्री यांचे आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रकल्पाच्या आर्थिक बाबींविषयी सुमारे १४०० कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी आर्थिक बळकटी विविध माध्यमांतून उभी करण्यात येणार आहे. बीओटी (Build, Operate, Transfer) पद्धतीचा अवलंब करून खासगी गुंतवणूक आकर्षित केली जाईल. महानगरपालिकेच्या वतीने बॉन्डच्या स्वरूपात निधी उभारण्याचाही विचार करण्यात येत आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.

**पाणीप्रश्नावर कायमस्वरुपी उपाययोजना**

सोलापूर शहराच्या दीर्घकालीन पाणी प्रश्नावर हा प्रकल्प कायमस्वरूपी उपाययोजना ठरेल. नागरिकांना स्वच्छ, पुरेसा आणि नियमित पाणीपुरवठा देण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असून या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व यंत्रणा समन्वयाने काम करतील, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी स्पष्ट केले.

**सुमारे १११७ किमीची नवीन वितरण व्यवस्था**

शहरासाठी सुमारे १८६० किमी वितरण जाळ्याची आवश्यकता आहे. सध्या ८५० किमी व्यवस्था कार्यरत आहे. प्रस्तावित योजनेअंतर्गत नवीन जलशुद्धीकरण केंद्रे, मुख्य जलकुंभ, सुमारे १११७ किमी नवीन वितरण व्यवस्था, सौर ऊर्जा प्रकल्प, यांत्रिक व विद्युत कामे, रस्ते दुरुस्ती यांसह विविध कामांचा समावेश आहे. या योजनेमुळे शहरात २४७ अखंडित व शाश्वत पाणीपुरवठा करण्याचा उद्देश आहे.

## मनपाची ५० हजार मिळकती शोधण्यासाठी मोहीम सुरु

### नगरसेवक अनंत जाधव यांच्या सभेतील सूचनेवर अखेर कार्यवाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ एप्रिल-**

शहर-हद्दवाढ भागातील प्रलंबित मिळकतींचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी नगरसेवक अनंत जाधव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. त्यांनी महापालिका सभेत मांडलेल्या सूचनेवर अखेर कार्यवाही सुरू झाली आहे. सोलापूर महानगरपालिकेने ५० हजार मिळकती शोधण्यासाठी १०० अधिकाऱ्यांची नियुक्ती केली.

शहर व हद्दवाढ भागात मोठ्या प्रमाणावर नागरी वसाहती उभ्या राहिल्या असल्या तरी ७० टक्के मिळकतींकडे बांधकाम परवाना नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. तसेच अनेक मिळकतदारांकडे सातबारा उतारे नसल्याने मोजणी प्रलंबित असल्या मुळे नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर मिळकतींचे तातडीने नियमितीकरण करण्याची मागणी करताच महापालिकेने सर्वेक्षण मोहीम हाती घेतली आहे. नियुक्त १००



अधिकारी शहर व हद्दवाढ भागात प्रत्यक्ष पाहणी करून नव्याने उभारलेल्या इमारती, गाळे व सदनिकांची माहिती संकलित करणार आहेत. त्यानंतर मिळकतींचे करमूल्यांकन करून करआकारणीची बिले देण्यात येणार आहेत. या मिळकती नियमित झाल्यास महापालिकेला किमान १० ते १५ कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळू शकतो. यासाठी नगर भूमापन विभागाकडून मोजणी करणे अत्यावश्यक आहे. २०२१ मध्ये यासाठी ५ कोटी रुपये देऊनही काम सुरू न झाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली होती.

## उन्हाळी सुट्ट्यांमुळे विशेष रेल्वेगाड्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ एप्रिल-**

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये प्रवाशांची होणारी अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन पंढरपूर-तिरुपती, बंगळुरू कॅन्टोनमेंट-कलबुरगी आणि बंगळुरू-बीदर या विशेष गाड्यांची सुविधा यापुढेही सुरु ठेवण्यात येणार आहे, असे रेल्वेकडून सांगण्यात आले.

तिरुपती-पंढरपूर साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी (शनिवारी), पंढरपूर-तिरुपती विशेष रेल्वेगाडीचे प्रत्येकी एक फेरी अनुक्रमे शनिवार व रविवार वाढविण्यात आले आहे. बंगळुरू कॅन्टोनमेंट-कलबुरगी साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी दि.२५ एप्रिल २०२६ पर्यंत दर शनिवारी धावणार आहे. कलबुरगी-बंगळुरु कॅन्टोनमेंट साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी दि.२६ एप्रिल २०२६ पर्यंत दर रविवारी, SMVT बंगळुरु-बीदर द्विसाप्ताहिक विशेष रेल्वेगाडी दि.२६ एप्रिल २०२६ पर्यंत दर शुक्रवारी व रविवारी धावणार आहे. बीदर-ङचतढ बंगळुरु द्विसाप्ताहिक विशेष गाडी दि.२७ एप्रिल पर्यंत दर शनिवार, सोमवारी धावणार आहे.

उपयुक्त गाड्यांच्या रचनेत आणि थांब्यांमध्ये कोणताही बदल होणार नाही, असेही रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले.





## व्यसन, मौजमजेसाठी चैन स्नॅचिंग; विधीसंघर्ष बालके पोलिसांच्या ताब्यात

### ५ लाख ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

व्यसन, मौजमजा करण्यासाठी चैन स्नॅचिंग करणाऱ्या दोन विधीसंघर्ष बालकांना फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या डी.बी.पथकाने ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ३३ ग्रॅम सोन्याचे मणी मंगळसूत्र, गुन्ह्यात वापरलेली काळी पल्सर मोटार सायकल, २ मोबाईल फोन असा ५ लाख ५८ हजार ५८८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. ७ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी अवंती नगर परिसरातील विजयालक्ष्मी सावळे (वय-६६) ह्या आपल्या मैत्रिणींसोबत पायी चालत जात होत्या. यावेळी विनानंबर प्लेटच्या काळ्या रंगाच्या पल्सरवरून आलेल्या दोन अज्ञातांनी त्यांच्या गळ्यातील ३३ ग्रॅम सोन्याचे मणी मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून पोबारा केला होता.याप्रकरणी वरिष्ठ पोलिस निरीक्षक महादेव राऊत, सहाय्यक पोलिस निरीक्षक संजय क्षीरसागर यांच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक बाबीच्या आधारे तपास करुन बीड येथून त्या दोन विधीसंघर्ष बालकांना ताब्यात घेऊन अधिक माहिती घेतली असता व्यसन आणि मौजमजा करण्यासाठी पैसे हवे असल्याने आपण हे कृत्य केले, अशी कबुली त्या बालकांनी दिली.

पोलिस आयुक्त एम.राजकुमार, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक पोलिस आयुक्त प्रताप पोमण यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या डीबी पथकाने ही काम गिरी बजाविली. घटना घडल्यानंतर अवघ्या दोन दिवसात या गुन्ह्याचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. यातील फिर्यादी महिला पोलिसांचे आभार मानले.

## नेहरु वसतिगृह पाडकामाच्या विरोधात विद्यार्थ्यांचा एल्गार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ एप्रिल-**

पार्क चौक परिसरातील जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असलेल्या जवाहरलाल नेहरु विद्यार्थी वसतिगृह पाडकामाच्या विरोधात विद्यार्थ्यांनी एल्गार पुकारला आहे.

जवाहरलाल नेहरु विद्यार्थी वसतिगृह बचाव समितीने प्रसाद मोहिते, महावीर बंडगर, सचिन मोकाशी, ॲड. आकाश कस्तुरे, ॲड.चैतन्य केंगार आदींच्या शिष्टमंडळाद्वारे जि.प.अध्यक्ष दीपक वैद्य, जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे निवेदन सादर केले. सन १९७८ पासून 'ना-नफा, ना-तोटा' तत्त्वावर सुरू असलेल्या या वसतिगृहात ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, बांधकाम कामगार, मागासवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थी राहून उच्च शिक्षण घेत आहेत. कमी खर्चात निवासाची सुविधा उपलब्ध असल्याने अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य या वसतिगृहातून घडले असून त्यांनी प्रशासकीय, राजकीय आणि व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



मागील काही वर्षांत वसतिगृहाची फी वाढविणे, दुरुस्ती व देखभाल न करणे, अधीक्षकांची नेमणूक न करणे अशा प्रकारांनी विद्यार्थ्यांची संख्या जाणीवपूर्वक घटविण्याचा प्रयत्न झाला. आता या वसतिगृहाच्या जागेवर व्यापारी संकुल उभारण्याचा निर्णय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अन्यायकारक व दूरदृष्टीचा अभाव दर्शवणारा आहे, असेही या निवेदनात म्हटले आहे.



**जनावरे सावलीत...**

सोलापूर : रस्ते सोलापूर शहरातील तापमान वाढत असताना एकीकडे रस्ते निर्मनुष्य दिसत आहेत. तर दुसरीकडे मुखी जनावरे तुरळक सावलीच्या आसऱ्याला दिसून आली. जुळे सोलापूर परिसरात टिपलेले छायाचित्र.

## शिष्यवृत्ती परीक्षा : जिल्ह्यात ४८ हजार ९४६ विद्यार्थी सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने इयत्ता चौथी (प्राथमिक) व सातवी (माध्यमिक) शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन रविवार, दि. २६ एप्रिल रोजी करण्यात आले असून, यासाठी सोलापूर जिल्ह्यातून एकूण ४८ हजार ९४६ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत.

प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी ही माहिती दिली. यामध्ये इयत्ता चौथीसाठी ३१ हजार ६४४, तर सातवीसाठी १७ हजार ३०२ विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले आहेत. विद्यार्थ्यांच्या मोठ्या प्रतिसादामुळे जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाकडून परीक्षेची व्यापक तयारी करण्यात आली आहे.

परीक्षेसाठी जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. इयत्ता चौथीच्या परीक्षेसाठी १८३ परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली असून, सातवीसाठी ११३ केंद्रांवर परीक्षा घेतली जाणार आहे. सर्व केंद्रांवर आवश्यक सुविधा, देखरेख आणि शिस्तीची व्यवस्था करण्यात आली असल्याचेही सांगण्यात आले. ही परीक्षा दोन सत्रांमध्ये होणार आहे. सकाळच्या सत्रात ११.०० ते १२.३० या वेळेत तर दुपारच्या सत्रात २.०० ते ३.३० या वेळेत प्रश्नपत्रिका सोडविण्याची वेळ निश्चित करण्यात आली आहे. परीक्षेच्या गुण विभागणीबाबत सांगायचे झाल्यास, प्रथम भाषा या विषयासाठी २५ प्रश्न असून ५० गुण निश्चित करण्यात आले आहेत. गणित विषयासाठी ५० प्रश्न असून १०० गुण आहेत. या दोन्ही विषयांचे एकूण ७५ प्रश्न आणि १५० गुण होतात. तसेच तृतीय भाषा या विषयासाठी २५ प्रश्न व ५० गुण, तर बुद्धिमत्ता चाचणीसाठी ५० प्रश्न व १०० गुण निश्चित आहेत. या भागाचेही एकूण ७५ प्रश्न व १५० गुण आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षेला वेळेत उपस्थित राहून आवश्यक तयारीसह परीक्षा द्यावी, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे. तसेच पालकांनीही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवावा, असेही प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## पुतळा बसवण्यावरून तणाव; १२ आरोपींना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ एप्रिल-**

पुतळा बसवल्याप्रकरणी गावामध्ये तणाव निर्माण झाला. दोन्ही समाज एकमेकांसमोर आंदोलनाकरिता बसले होते. प्रशासनाने जागेची मोजणी करुन घेण्याबाबत समन्वय्याने तोडगा काढला. मात्र, मोजणी अधिकाऱ्यांच्या कामात अडथळा आणणाऱ्या १२ आरोपींना अटक करण्यात आली.

मौजे अंजनगाव (ता.माढा) येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसवल्याप्रकरणी गावामध्ये तणाव निर्माण झाला होता. अशावेळी प्रशासनाने जागेची मोजणी करून घेण्याबाबत समन्वय्याने तोडगा काढला होता. परंतु या मोजणी करताना मोजणी अधिकारी यांच्या कामात हस्तक्षेप करून कामात अडथळा आणणाऱ्या आरोपींना अटक करण्यात आली. यापुर्वी पोलिसांवर दगडफेक करून व त्यांच्या दिशेने तोफा वाजवून जीवघेणा हल्ला करणाऱ्या अटक करण्यात आलेल्या १२ पैकी १० आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. अटक करण्यात आलेल्यांमध्ये शिवम भारत वाघमोडे (वय-२७, रा. अंजनगाव, ता.माढा), बाळू नवनाथ वाघमोडे (वय-३१, रा.अंजनगाव, ता.माढा), सतीश हनुमंत वाघमोडे, (वय-२५, रा.अंजनगाव ता.माढा), बंडू दिगंबर वाघमोडे, (वय-३५, रा.अंजनगाव, ता.माढा), अरुण सुभाष वाघमोडे (वय-३२, रा.अंजनगाव, ता. माढा) नितीन सुरेश वाघमोडे, (वय-३५, रा.अंजनगाव, ता.माढा) यांचा समावेश आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# राष्ट्रविरोधी शक्तींपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव जपा

## ॲड. क्षितिज गायकवाड : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका समजून घेण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रविरोधी शक्तींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा वापर करू न देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते ॲड. क्षितिज गायकवाड यांनी केले. श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारक, अखिल भारतीय अधिवक्ता परिषद शाखा सोलापूर, समरसता गतिविधि सोलापूर आणि विवेक विचार मंच सोलापूर यांच्यातर्फे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शुक्रवारी 'शोध बाबासाहेबांचा' या विषयावरील जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. शिवस्मारक सभागृहात ॲड. क्षितीज गायकवाड यांनी सोलापूरकरांना मार्गदर्शन केले.



प्रारंभी भारतमातेच्या प्रतिमेचे आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण समिती सभापती संस्कृती सातपुते, अधिवक्ता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ॲड. धनंजय माने, शहर अध्यक्ष ॲड. महेश अग्रवाल, शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, विवेक विचार मंचच्या जिल्हा संयोजिका अश्विनी चव्हाण उपस्थित होत्या. ॲड. क्षितिज गायकवाड म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे हिंदू समाजातील हिरा होते. दुर्दैवाने त्यांचे महत्त्व हिंदू समाजाला कळाले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हिंदू विरोधी ठरवण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. मात्र त्यांची सत्य बाजू कधीही पुसली जाणार नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भगवान गौतम बुद्धांचा मार्ग समाजाला दाखविला तो भारतीयांच्या फायद्याचा आहे. प्रत्येकाच्या श्रद्धा आणि मतांचा आदर करत त्या श्रद्धेचे पालन करण्याचे स्वातंत्र्य देत संविधानाला मानणारा आदर्श नागरिक तयार करण्याची आपली भूमिका असली पाहिजे.

शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे, महिलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान देशभक्त होते, असेही ऍड. क्षितिज गायकवाड याप्रसंगी म्हणाले. भारतीय संविधानातील उद्देश पत्रिकेचे वाचन ॲड. परमानंद जवळकोटे यांनी केले. अधिवक्ता परिषदेचे प्रांत संघटन सचिव ॲड. लक्ष्मीकांत गवई यांनी प्रास्ताविक केले. ॲड. वैशाली महिंद्रकर यांनी सूत्रसंचालन तर रंगनाथजी बंकापूर यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी अधिवक्ता परिषदेच्या प्रांत सदस्या ऍड. नीता मंकणी, विवेक विचार मंचाचे शहर संयोजक सिद्धांत बाबरे, जिल्हा सहसंयोजक ड. प्रशांत कांबळे, अधिवक्ता परिषदेचे सचिव ॲड. शांतिवीर महिंद्रकर, समरसता गतीविधीचे जिल्हा सहसंयोजक अंबादास खराडे आदी उपस्थित होते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत घडवण्यासाठी कटिबद्ध राहू

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांना अधिकार मिळाले. त्याबद्दल संपूर्ण देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ऋणी आहे. हिंदू धर्माच्या काही परंपरांमध्ये सुधारणा करण्याचे महान काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांच्या स्वप्नातील भारत घडवण्यासाठी आपण कटीबद्ध असले पाहिजे, असे सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते यांनी सांगितले.

## महत्वाचे...



### वाणी चिंचाळे येथे पोस्ट ऑफिसचा शुभारंभ

**सांगोला, दि. ११ एप्रिल-**

खा .धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून माढा लोकसभा मतदारसंघात २१ नवीन पोस्ट ऑफिस मंजूर करून घेतले आहेत. यापैकी सांगोला तालुक्यातील वाणी चिंचाळे येथील नवीन पोस्ट ऑफिसचा शुभारंभ खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ.निकिता देशमुख, पंढरपुर डाक विभागाचे अधीक्षक मुन्ना कुमार उपस्थित होते.



### वेळापूर पोलिसांचा रूट मार्च

**वेळापूर, दि. ११ एप्रिल-**

वेळापूर पोलीस स्टेशनच्या वतीने वेळापूर शहरातून गुन्हेगारावर वचक बसवण्यासाठी व कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी जयंती, उत्सव निमित्त शांतता टिकून रहावी यासाठी वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे यांच्या वतिने पोलीस कर्मचारी यांच्यासमवेत गुरुवारी सायंकाळी वेळापूर शहरातून रूट मार्च काढण्यात आला. नागरिकांना आगामी उत्सव जयंती / उत्सव शांततेत व सामाजिक सलोखा ठेवून साजरी करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या त्याचबरोबर आक्षेपार्ह धार्मिक व सामाजिक सलोखां बिघडेल अशा पोस्ट सोशल मीडियावर टाकणाऱ्या वर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा सूचना देण्यात आल्या. यावेळी प्रभारी अधिकारी आशिष कांबळे म्हणाले की वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व गावांमध्ये शांतता रहावी कायद्याचे सर्वांनी पालन करावे जो कायद्याच्या विरोधात जाईल किंवा कायदा मोडेल त्यांच्यावर कायदेशीर गंभीर गुन्हे दाखल केले जातील असे सांगितले. सदरच्या रूट मार्चला वेळापूर पोलीस स्टेशन येथून सुरुवात होऊन पालखी चौक , वेळापूर एसटी स्टँड, फुले शाहू आंबेडकर नगर , व्यापार पेठ, तलाठी कार्यालय वेळापूर, ग्रामपंचायत कार्यालय येथून निघून वेळापूर पोलीस स्टेशन येथे रूट मार्चची सांगता झाली.



### हिंदुस्तान फीड्सतर्फे सांगोला विद्यामंदिरमध्ये सॅनिटरी पॅड्सचे वाटप

**सांगोला, दि.११ एप्रिल-**

हिंदुस्थान फीड्सच्यावतीने सामाजिक उत्तरदायित्व निधीतून सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज येथे सॅनिटरी पॅड्सचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मार्केटिंग ऑफिसर निलेश इंगळे, सेल्स ऑफिसर वैभव मलमे, नगरसेवक माऊली तेली, उद्योगपती नागेश तेली, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चारूदत्त जगताप, पर्यवेक्षक काकासो नरूटे, कंपनीचे डीलर अन्वर बागवान, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हंबीरराव माने यांची नात देवयानी माने यांनी हा प्रकल्प यशस्वीपणे राबवण्यासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. या उपक्रमांतर्गत सांगोला तालुक्यातील शाळांना ३० हजार सॅनिटरी पॅड्स आणि ७० हजार वह्यांचे वाटप केले जाणार आहे. प्रास्ताविक शैलेजा झपके, सूत्रसंचालन संध्या तेली यांनी केले. आभार मनीषा पांडे यांनी मानले.

### सलगर (बु.) येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या साहित्याची चोरी

**मंगळवेढा, दि. ११ एप्रिल-**



सलगर बु. येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेचे गेट तोडून चोरट्याने आत प्रवेश करुन १७ हजार रुपये किंमतीचे विविध वस्तूंची चोरी करण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी शाखाधिकारी विजयकुमार मुदगूल यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.७ रोजी सांयकाळी ६.३० वाजता बँकेतील शिपाई मंहतेश पाटील यांनी बँक बंद करुन घरी गेले. दि.८ रोजी सकाळी ७ वाजता शिपाई बँकेत गेल्यावर त्यांनी फिर्यादीस फोन करुन कळविले की, बँकेचे कोणीतरी शटर उघडले असून तात्काळ तुम्ही बँकेकडे या. फिर्यादी व शिपाई यांनी बँकेत जावून पाहिले असता बँकेचे सी.सी. टी.व्ही, मॉनिटर, शटर, कुलूप, केबल असे अंदाजे दहा हजार रुपये किंमतीचे तोडून फोडून नुकसान केल्याचे दिसून आले. आतील लॉकर उघडण्याचा प्रयत्न केलेला दिसला. यावेळी सीसीटीव्हीचे डी.व्ही.आर चोरीला गेल्याचे निदर्शनास आले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### नागनहळळी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलामध्ये निवड

**अक्कलकोट, दि. ११ एप्रिल-**

नागनळळी आश्रमशाळेचा माजी विद्यार्थी महेशकुमार गायकवाड यांची भारतीय सैन्यदलाच्या बेंगलोर रेजिमेंटमध्ये निवड झाल्याबद्दल शाळेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान संस्थेचे सचिव जावेद पटेल यांच्या हस्ते संपन्न झाला. महेशकुमार याने इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण नागनळळी आश्रमशाळेत घेतले. तो या शाळेचा निवासी विद्यार्थी होता.

## वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानतर्फे सोमवारपासून 'बसव सप्ताह'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**



कुंभार वेस येथील वीरशैव लिंगायत प्रतिष्ठान, सोलापूर यांच्यावतीने महात्मा बसवेश्वर जन्मोत्सवानिमित्त दि. १३ ते १९ एप्रिल २०२६ या कालावधीत 'बसव सप्ताह' आयोजित करण्यात आले असल्याची माहिती उत्सव अध्यक्ष लक्ष्मीकांत बिराजदार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सप्ताहाची सुरुवात सोमवार दि. १३ एप्रिल रोजी सकाळी श्री सिद्धेश्वर तलाव परिसरात वृक्षारोपणाने होणार असून, मंगळवारी योगशिबिर आयोजित करण्यात आले आहे. बुधवारी आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. गुरुवारी ज्येष्ठ नागरिकांना हेल्थ कार्ड वाटप तसेच इयत्ता १० वीतील विद्यार्थ्यांसाठी बुक बँक उपक्रम राबविण्यात येणार आहे. शुक्रवारी सकाळी पाणपोईचे उद्घाटन करण्यात येईल. त्याच दिवशी सायंकाळी श्री बसवमूर्ती प्रतिष्ठापना निबंध स्पर्धा व बक्षीस वितरण कार्यक्रम होणार आहे. शनिवारी महिला भजन संध्या आयोजित करण्यात आली आहे. सप्ताहाचा समारोप रविवारी शहाळ महोत्सव व श्री बसवमूर्ती पूजनाने होणार आहे. यावेळी राजशेखर विजापुरे, अनिल वजीरकर, शशिकांत बिराजदार, सुनील शरणार्थी, रमेश पाटील उपस्थित होते.

## अक्कलकोटात पाणपोई सापडली नियमांच्या कचाट्यात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ एप्रिल-**

अक्कलकोट शहरातील वीर सावरकर चौकातील (तूप चौक) सामाजिक कार्यकर्त्यांची पाणपोई ही नियमांच्या कचाट्यात सापडल्याने अखेर पाणपोई बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. नगरपरिषदेच्या विचित्र नियमांमुळे कडक उन्हाळ्यात पाणपोई बंद करण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.




अक्कलकोट शहरात गेल्या १८ वर्षापासून उन्हाळ्यात पाणपोईद्वारे समाजसेवा करण्याचे काम सामाजिक कार्यकर्ते वसंत देडे हे करत आहेत. शहरातील विविध भागात नगर परिषदेकडून रीतसर परवाना घेऊन वसंत देडे पाणपोईद्वारे नागरिकांना, अबाल वृद्धांना थंड पाणी पाजण्याचे लोकोपयोगी काम करत असतात.वसंत देडे यांनी यावर्षी शहरातील वीर सावरकर चौक परिसरात पाणपोई सुरू केली होती. या पाणपोईमुळे शहरातील व परगावच्या अबाल वृद्धांना व नागरिकांना थंड पाण्याची मोठी सोय होत होती.

सर्वसामान्य माणसाकडे बाटलीतील पाणी विकत घेऊन पिण्यासाठी पैसे नसतात. ती माणसे या पाणपोईवर येऊन थंड पाणी पिऊन आत्मिक समाधान मानत असत. वसंत देडे यांनी सुरू केलेली पाणपोई ही नगर परिषदेने नियम व अटींच्या मुद्द्यावर पाणपोईचे स्थळ हलविण्यास भाग पाडले.

वीर सावरकर चौकातील काही व्यापारी लोकांनी ही पाणपोई बंद करण्यासाठी राजकीय दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. लोकांसाठी काम करणाऱ्या पाणपोई चालक , सामाजिक कार्यकर्ते वसंत देडे यांनी नगरपरिषदेच्या विचित्र अटींमुळे शेवटी पाणपोई बंद करण्याचा निर्णय घेतला. ज्या वीर सावरकर चौकात वसंत देडे यांनी पाणपोईची सुरुवात केली होती या ठिकाणची पाणपोई बंद केली.

समाजातील विधायक काम करणाऱ्या समाजसेवकांना काम न करू देणाऱ्या नगरपरिषद प्रशासनाच्या एकूण भूमिकेबद्दल आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

## बोरामणीत १ मे रोजी मोफत सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**वळसंग, दि.११ एप्रिल-**

अक्कलकोटचे माजी आमदार तथा माजी राज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त पंचायत समितीचे माजी सदस्य धनेश आचलारे मित्र परिवारातर्फे शुक्रवार १ मे रोजी सायंकाळी ५ वाजून २२ मिनिटांच्या गोरज मुहूर्तावर बोरामणी येथे मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती या विवाह सोहळ्याचे मुख्य संयोजक तथा पंचायत समितीचे माजी सदस्य धनेश आचलारे यांनी दिली. विवाह सोहळ्यात सहभागी होणा-या जोडप्यांना हळदीचे कपडे, वधूस शालू, मणी-मंगळसूत्र व सौभाग्य अलंकार, वरास सफारीचा पोषाख देण्यात येणार आहे. तसेच सर्व व-हाडी मंडळीसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. या विवाह सोहळ्यात सहभागी जोडप्यांना जर पहिली मुलगी झाल्यास त्या मुलींच्या नांवे बँकेत पाच हजारांची ठेव ठेवण्यात येणार आहे. विवाह सोहळ्यासाठी वधू-वरांना शुभशिर्वाद देण्यासाठी परमपूज्य काशी पीठाचे जगद्गुरु डॉ मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, गृहमंत्री योगेश कदम, आमदार सुहास बाबर, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, मंगेश चिवटे, जिल्हाप्रमुख अमर पाटील व अमोल शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा विवाह सोहळा संपन्न होणार आहे. इच्छुकांनी आपली नांवे अप्पा हलसगे(९१५३४५५०५०) मल्लिकार्जुन सडडू (९९२१०२६७६६) लक्ष्मीकांत आचलारे ( ९०१११२८९००) यांच्याकडे नोंदवावेत, असे आवाहन त्यांनी केले.

## रब्बी हंगामात जनावरांसाठी चारा टंचाई होईल

### वडवळ येथील नागनाथ देवाच्या यात्रेतील भाकणूक

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ११ एप्रिल-**



देशाच्या राजकारणातील स्थिती एकसंघ ठेवण्यासाठी सतत अडचणी येत राहतील. मात्र देशासमोरील परिस्थिती शांतते सह एकसंघ ठेवण्यासाठी प्रयत्न होतं राहतील रब्बी हंगामात जनावरांसाठी चारा टंचाई होईल, वर्षभरात रोगराई, जिवीत हानी होत राहील, पाऊस समाधानकारक पडेल, अशी भाकणूक श्रीक्षेत्र वडवळ येथील श्री नागनाथ देवाच्या यात्रेत गणाच्या दिवशी खर्गेमहाराज पोपटबुवा शिवपुजे यांनी वर्तविली.

श्रीक्षेत्र वडवळ येथील ग्रामदैवत श्री नागनाथ यात्रेचा गण सोहळा गुरुवार दि. ९ रोजी संपन्न झाला. गणासह खर्गे महाराजांची मिरवणूक, पालखीची मुख्य प्रदक्षिणा पाहण्यासाठी व दर्शणासाठी भाविकांची अलोट गर्दी उसळली होती.

श्रीक्षेत्र मोहोळ व श्री क्षेत्र वडवळ येथील मानकरी, संत भाविकांच्या उपस्थितीत पोपटबुवा खर्गेमहाराज यांना विधिवत मंदिरात आणल्यानंतर गण सोहळ्यास प्रारंभ झाला. सहा शिवगण व खर्गे महाराज यांना खांद्यावर घेऊन निघालेली मिरवणूक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. मोहोळ येथून आलेल्या श्री नागनाथांच्या पालखी समवेत संत मंडळीचे टाळाच्या गजरात अखंड भजन, मिरवणूक मार्गांवर सर्वत्र रांगोळीच्या पायघड्या यामुळे सर्वत्र नागेशमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी प्रमुख दिल्ली दरवाजात राजकीय भाकणूक झाली. त्यानंतर बहिरंभट, उखळ, खर्गतिर्थ, पेरणी, मुंगीचा धोंडा या ठिकाणी खर्गेमहाराज यांच्या करवी भाकणूक वर्तवण्यात आली. खर्गतीर्थ येथे खर्गे महाराज व भक्त हेगरस यांची गुरू-शिष्य भेटीचा सोहळा डोळ्याचे पारणे फेडणारा ठरला.

गणाच्या दिवशी गावातील विविध तरूण मंडळे, सामाजिक संस्था यांच्यावतीने भाविकांना दिवसभर मोफत अल्पोपहार, शीतपेय यांचे वाटप करण्यात आले. यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी श्री नागनाथ देवस्थान पंच कमिटी, अन्नछत्र मंडळ, श्री नागनाथ देवस्थान यात्रा कमिटी, ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## मंगळवार पेठ येथून दुचाकी गेली चोरीला



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ एप्रिल-**

राहत्या घरासमोर हँडल लॉक करून, पार्क करून ठेवलेली मोटरसायकल मंगळवार पेठ या भागातून अज्ञात चोरीला गेली आहे. दि. १ एप्रिल रोजी वासुदेव कमला किशोर गौड, रा. ७१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर याची काळ्या रंगाची लाल पट्टा असलेली हिरो एचएफ डीलक्स ३० हजार रुपयांच्या किमतीची मोटरसायकल क्रमांक एम हेच तेरा सी जी ५६ ०६ ही राहत्या घरासमोर हँडल लॉक करून पार्क केली होती. अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली आहे. याबाबत दि. १० एप्रिल रोजी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास लोहार करत आहेत.

## सोलापूरच्या रसिका-सानिका कुलकर्णी यांच्या गायनात भाविक तल्लीन

### स्वामी समर्थ पुण्यतिथीच्या धर्मसंकीर्तन महोत्सवातील सातवी पुष्पमाला



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ एप्रिल-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात आज सोलापूरच्या रसिका-सानिका कुलकर्णी यांच्या सुमधुर गायनात भाविक तल्लीन झाले. श्री.स्वामी समर्थांच्या १४८ व्या पुण्यतिथी महोत्सवा निमीत्त श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान आयोजित धर्मसंकीर्तन महोत्सवात सातव्या पुष्पमालेतील दुसरे सत्र आज सोलापूरचे गायिका रसिका सानिका कुलकर्णी यांच्या भक्तीमय गायन सेवेने गुंफले.

या गायन सेवेत रसिका-सानिका कुलकर्णी यांनी कार्यक्रमाची सुरुवात सूर निरागस गणेश वंदन गीताने केली. यानंतर वृंदावनी वेणू, स्वप्नांत आले, माझ्या गुरुदेव दत्त, उघड नयन देवा, पराधीन आहे जगती, कानडा राजा पंढरीचा इत्यादी गीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. गायन सेवेत त्यांना तबल्यावर अक्षय भडंगे, ऑक्टोपॅडवर यश जवळकर, साऊंड सिस्टीमवर प्रकाश कासेगांवकर, यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे निवेदन अभिषेक परदेशी यांनी केले. प्रा. ओंकार पाठक यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष व नगरसेवक महेश इंगळे यांनी गायिका रसिका-सानिका कुलकर्णी व मनिषा-जतीन कुलकर्णी यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून सत्कार केला.

याप्रसंगी कुलकर्णी कुटूंबियांच्या वतीनेही मंदीर समितीचे प्रमुख महेश इंगळे यांचा शाल श्रीफळ देवून जतीन कुलकर्णी यांनी सत्कार केला. यावेळी महेश इंगळे, प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वला सरदेशमुख, प्रा. शिवशरण अचलेर, बाळासाहेब कुलकर्णी, जतीन कुलकर्णी, मनिषा कुलकर्णी, सुरेश भोसले, प्रशांत गुरव, गणेश दिवाणजी, वेदेश गुरव, प्रसाद पाटील, संदीप पंडीत, रमेश शिंदे, अमर पाटील, मनोज जाधव, स्वामीनाथ लोणारी, दर्शन घाटगे, तुषार मोरे, मनोज इंगुले, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, आदीत्य गवंडी, श्रीमुख जगदाळे, दिपक जरिपटके, ज्ञानेश्वर भोसले, स्वामीनाथ लोणारी, काशिनाथ इंडे, रविराव महिंद्रकर, ऋषिकेश लोणारी, गिरीश पवार, अविनाश क्षीरसागर, नरसिंग क्षीरसागर, सागर गोंडाळ, महेश मस्कले, चंद्रकांत गवंडी, संतोष पराणे, प्रसाद सोनार, श्रीशैल गवंडी, संतोष जमगे, महादेव तेली, खाजप्पा झंपले उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## श्री स्वामी समर्थ पादुका सोहळ्याचे श्रीक्षेत्र अक्कलकोटकडे प्रस्थान

**वेळापूर, दि. ११ एप्रिल-**
येथील श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या श्री क्षेत्र वेळापूर ते श्री क्षेत्र अक्कलकोट या श्री स्वामी समर्थ पादुका सोहळ्याचे शनिवारी श्री क्षेत्र अक्कलकोट कडे मोठ्या उत्साही व भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. अक्कलकोट निवांसी श्री स्वामी समर्थ महाराज यांची ही १४८ वी पुण्यतिथी आहे. वेळापुर ते अक्कलकोट या पादुका सोहळ्याचे हे १७ वर्ष आहे. प्रस्थान पुजा श्री नवनाथ बनकर व प्रीती बनकर या उभयताच्या हस्ते करण्यात आली. या पूजेचे पौरोहित्य महेश स्वामी यांनी केले. वेळापूर येथील ग्रामदैवत श्री अर्धनारी नटेश्वर मंदिरात पादुकांची रवी गुरव यांच्या हस्ते विधीवत पूजा करण्यात आली व सोहळा बोडले, पिराची कुरोली, भंडीशेगाव मार्गे श्री क्षेत्र पंढरपूर मुक्कामी पोहोचला. बुधवार दि. १५ एप्रिल रोजी श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळा साजरा होणार आहे.



## महात्मा फुले जयंती...



### कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालय, बार्शी

येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात सत्यशोधक समाजाचे संस्थापक, थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी ते प्रथमता क्रांतीसूर्य म. फुले त्यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त ग्रंथपाल अशोक गवळी यांचे हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाचे अध्यक्षपदी ग्रंथालयाचे कार्यवाह मधुकांत ठोकळ हे होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुहासबप्पा सुतार, गायक सुनिल फल्ले, भागवत बोबडे, शाम जानराव, राहुल लोंढे, अश्वस्त गुरव उपस्थित होते. प्रास्तविक ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी व्यक्त केले.



### क्रांतीसूर्य प्रतिष्ठान, पिसेवाडी

पिसेवाडी (ता. माळशिरस) येथे महात्मा फुले यांची जयंती क्रांतीसूर्य प्रतिष्ठान यांच्यावतीने साजरी करण्यात आली. ज्ञानाचा दीप प्रज्वलित करणारे क्रांतीबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन ताराराणी कुस्ती केंद्राच्या अध्यक्षा तथा माजी जिल्हा परिषद सदस्या शितलदेवी धैर्यशील मोहिते-पाटील व वेळापूर जिल्हा परिषद गटाच्या सदस्या मिनाक्षी मिलिंद सरतापे, सरपंच मोहन भाकरे, सरपंच सुरेश पिसे, सरपंच मोनिक शेंडे, उपसरपंच भाऊसाहेब पिसे, क्रांतीसूर्य प्रतिष्ठान अध्यक्ष आण्णासाहेब शेंडे, संचालक भागवत पिसे, ग्रा.प. सदस्य धनाजी साठे, पुष्पा पिसे, ज्ञानेश्वर पिसे, पांडुरंग पिसे, तात्या काळे, प्रकाश पवार, सहिल अतार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी अशिष कांबळे, रिपाई आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, उपसरपंच बाळासाहेब गायकवाड व अर्जुन बनकर, पोलीस पाटील सुमंत गायकवाड, दीपक पिसे, अमोल राऊत, विशाल बोराटे, अमोल पिसे, प्रकाश गायकवाड, संतोष पिसे, दादा पिसे, संतोष गायकवाड, सतीश पिसे, विजय बनकर, हरिदास वाघ उपस्थित होते.



### स्विमिंग ग्रुप, अक्कलकोट

स्विमींग ग्रुपच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त महात्मा जोतिबा फुले जयंती साजरी करण्यात आली. स्विमींग ग्रुपचे संस्थापक तथा श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रा. विद्याधर गुरव व अन्य मान्यवर आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी स्विमिंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष महेश मालक इंगळे, नगरसेवक अविनाश मडीखांबे, अप्पू पराणे, ओंकार उटगे, संतोष जवळगे, डॉ. राजू मलंग, अंकुश केत, बाळासाहेब एकबोटे, महादेव आडीवीतोटे, चंद्रकांत सोनटक्के, रमेश शिंदे, विद्याधर गुरव, प्रथमेश इंगळे, मल्लिनाथ माळी, अशोक कलशेट्टी, कुमार हतुरे, रमेश कणमुसे, राजू एकबोटे, अरविंद पाटील, श्रीकांत झिपरे उपस्थित होते.




### मराठा सेवा संघ, सोलापूर

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या शताब्दी जयंती निमित्त महात्मा फुले यांच्या पुतळ्यास मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेड यांच्यावतीने पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील, जिल्हाध्यक्ष जी.के. देशमुख, उपाध्यक्ष सदाशिव पवार, महानगराध्यक्ष सूर्यकांत पाटील, संभाजी ब्रिगडचे शहराध्यक्ष प्रकाश ननवरे, जिजाऊ ब्रिगेड विभागीय अध्यक्ष जगदाळे, जिजाऊ ब्रिगेड शहराध्यक्ष प्रीती कदम, गोवर्धन गुंड, सचिन चव्हाण, राज व्यवहारे, परशुराम पवार, प्रकाश डोंगरे, रमेश जाधव उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री शिंदेंच्या दौऱ्याआधी पंढरपूरच्या रस्त्यांचा प्रश्न ऐरणीवर

**●माजी नगरसेवक विक्रम शिरसट यांचे खड्ड्यांना हार घालून निषेध आंदोलन●**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ एप्रिल-**
महाराष्ट्राची 'दक्षिण काशी' म्हणून ओळख असलेल्या पंढरपूर शहरात दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा विकासनिधी येतो. मात्र, शहरातील रस्त्यांची बिकट अवस्था, वाढते खड्डे आणि अपूर्ण कामे यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर माजी नगरसेवक विक्रम शिरसट यांनी आक्रमक भूमिका घेत चक्क रस्त्यावरील खड्ड्यांना हार घालून आणि फुले उधळून 'रस्त्याची महापूजा' करत अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. या प्रतीकात्मक आंदोलनातून त्यांनी पालिका प्रशासन आणि विद्यमान लोकप्रतिनिधी यांच्या कारभारावर जोरदार टीका केली.



रविवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पंढरपूर दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शिवसेना शिंदे गटात भालके, सावंत यांच्यासह अनेक आजी-माजी नगरसेवकांचा जाहीर पक्षप्रवेश टिळक स्मारक येथे आयोजित केला आहे. मात्र, या कार्यक्रमाच्या ठिकाणी जाणाऱ्या मुख्य रस्त्याची दयनीय अवस्था प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे.

पंढरपूरसारख्या धार्मिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या शहरात मूलभूत सुविधांचा अभाव आणि रस्त्यांची दुरवस्था ही गंभीर बाब असून, आता उपमुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यानंतर तरी प्रशासन जागे होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

शहरात येणारा निधी नेमका कुठे जातो? नागरिकांना मूलभूत सुविधा का मिळत नाहीत? असा सवाल उपस्थित करत, शिरसट यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दौऱ्यातच या प्रश्नांकडे लक्ष वेधण्याचा इशारा दिला. तसेच, स्थानिक प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या निष्क्रियतेविरोधात थेट तक्रार करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या आंदोलना वेळी माजी नगरसेवक विक्रम शिरसट. दिपक येळे, अफजल सय्यद, यालप्पा कबाडे, तेजस कोरके , यश चंदनसेवे, दर्शन ताठे, बंटी खंडागले यांच्यासह अनेक युवक कार्यकर्ते उपस्थित होते.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती**

## सोलापूर मार्केट यार्ड १४ एप्रिलला बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ एप्रिल**
महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सोलापूर येथील श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे मार्केट यार्ड बंद राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आडते व्यापारी, माथाडी कामगार, ट्रान्सपोर्ट व्यावसायिक तसेच शेतकऱ्यांनी याची नोंद घेऊन व्यवहाराचे नियोजन करावे, असे आवाहन सिद्धेश्वर मार्केट यार्ड अडत व्यापारी संघ, सोलापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. बाजार समिती बंद राहणार असल्याने त्या दिवशी कोणतेही खरेदी-विक्री व्यवहार होणार नसून, संबंधित घटकांनी गैरसोय टाळण्यासाठी आगाऊ नियोजन करावे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.



**भगवंत महोत्सवात आज**

## बार्शीतील स्थानिक कलाकारांचा सूर-ताल

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१२ एप्रिल-**
बार्शीचे ग्रामदैवत श्री भगवंत यांच्या प्रकट दिनानिमित्त 'श्री भगवंत महोत्सव २०२६' च्या निमित्ताने स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

या महोत्सवांतर्गत होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी स्थानिक कलाकारांची निवड चाचणी आज रविवार, दि. १२ एप्रिल रोजी, सकाळी १० वाजता येथील स्व. यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृह या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे.

कलाकारांनी आपल्या कलेचे सादरीकरण करावे, असे आवाहन भगवंत महोत्सवाचे प्रणेते आ. राजेंद्र राऊत यांनी केले आहे. आज उपस्थित राहणाऱ्या कलाकारांचाच निवडीसाठी विचार केला जाईल. त्यानंतर येणाऱ्या कलाकारांना संधी दिली जाणार नाही. निवड झालेल्या कलाकारांना रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या मुख्य महोत्सवात आपली कला सादर करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

## भांबुर्डीत काळभैरवनाथाची यात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ११ एप्रिल-**
गजी ढोलाचा ठेका...सनई चौघडयाचा गजर...तरूणाईच्या जल्लोशात... रथातुन मिरवणूक...गुलालाची उधळण अन् चांगभलच्या गजरात पार पडली भांबुर्डी ग्रामदैवत काळभैरवनाथाची तीन दिवसाची यात्रा. यात्रेची काळभैरवनाथ व जोगेश्वरी मातेच्या लग्नाने सुरवात झाली. यात वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करीत गजी ढोल, लोक नाटयतमाशा, ऑर्केस्ट्रा, कुस्ती व तिसऱ्या दिवशी काळभैरवनाथाच्या मुर्तीची रथामधुन मोठ्या उत्साहात मिरवणुक काढुन ढोल ताशाच्या गजरात गुलालाची मुक्त उधळण करीत मिरवणुक पार पडली.

काळभैरवनाथ गावचे जागृत देवस्थान म्हणून गणले जाते. ९ ते ११ एप्रील दरम्यान पार पडलेल्या या यात्रेसाठी पंचक्रोशीतील अनेक भाविक हजेरी लावतात. शैक्षणिक, सामाजिक



अशा वेगवेगळ्या क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवणाऱ्या गावाचा तालुक्यात लौकीक आहे. नोकरी व्यवसाय यासाठी विखुरलेले गावकरी या यात्रेसाठी हजेरी लावतात महिला मुले यांचा सहभाग आसतो.

**मुख्य आकर्षण रथउत्सव**

काळभैरवनाथ व जोगेश्वरी मातेची मुर्ती रथामध्ये ठेवली जाते. रथ लोक ओढतात व रथा समोर फटाके उडवले जातात. विविध वादयाच्या गजरात गावभर प्रदक्षणा घातली जाते. रथाच्या मार्गावर सुंदर रांगोळया काढल्या जातात. यावेळी रथाला हजारो रुपयांच्या नोटांच्या माळा बांधल्या जातात. नारळाची तोरणे बांधली जातात. अनेक भाविक नवस बोलतात तर काही भाविक लहाण मुलांना रथावरून खाली कापड धरून त्यावर टाकतात. ढोल ताशाच्या गजरात काळभैरवनाथच चांगभल... घोड्यावरल्या देवाच चांगभल, अशी आरोळी कानी पडते आणी होते गुलालांची मुक्त उधळण. अबाल वृद्ध सहीत सर्व यात्रा गुलालात न्हाहुण निघते.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन अत्याचार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ एप्रिल-**
बार्शी तालुक्यातील एका गावात १४ वर्ष ५ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून तिचे अपहरण करुन लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात मुख्य आरोपीसह त्याला पळून जाण्यास मदत करणाऱ्या एकूण ६ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी आणि मुख्य आरोपी हे एकाच गावातील रहिवासी आहेत. मुलगी अल्पवयीन असल्याची पूर्ण कल्पना असतानाही, आरोपीने तिच्याशी जवळीक साधून तुझे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यावर तुझ्याशी लग्न करेनर असे गोड बोलून तिला जाळ्यात ओढले. मुख्य आरोपीने त्याच्या इतर ५ मित्रांच्या मदतीने पीडितेस मोटारसायकलवर बसवून बार्शी येथे आणले. बार्शी येथून लक्झरी बसने तिला पुणे येथे नेण्यात आले. तेथे आरोपीने आपल्या मावशीच्या घरी पीडितेस डांबून ठेवले. लग्न करण्याचे खोटे आमिष दाखवून मुख्य आरोपीने पीडितेवर तीन वेळा शारीरिक अत्याचार केले. सुरुवातीला या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, पीडितेच्या जबाबानंतर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन कलमे वाढवण्यात आली आहेत. पीडित मुलीस महिला पोलीस कर्मचारी यांच्या संरक्षणाखाली सिव्हील हॉस्पिटल, सोलापूर येथे वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आलेले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहेत.

## पांगरीत युवकाची आत्महत्या

**बार्शी :** तालुक्यातील पांगरी येथे एका २८ वर्षीय युवकाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मृत युवकाचे नाव प्रशांत रामा गायकवाड (वय २८, रा. उक्कडगाव रोड, पांगरी) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत गायकवाड हे काही दिवसांपासून घरात एकटेच राहत होते. त्यांची पत्नी आरती गायकवाड माहेरी गेली होती. दि. ७ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास त्यांनी घरातील लोखंडी अँगलला दोरीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. ही घटना दि. ८ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास शेजारी राहणारे दत्तात्रय लक्ष्मण माने यांच्या लक्षात आली. त्यांनी तत्काळ नातेवाईकांना माहिती दिली. यानंतर मावस भाऊ अनिल अंगरके यांनी पोलिसांना कळवले. या प्रकरणी पांगरी पोलीस ठाण्यात आत्महत्येची नोंद करण्यात आली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्यास सत्ताधारी अन् विरोधी गटाकडून सर्वानुमते मंजुरी



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १२ एप्रिल-**
बार्शी नगरपरिषदेच्या शुक्रवार, दि.११ एप्रिल रोजी पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या जागी पूर्णाकृती पुतळा उभारण्यास सत्ताधारी व विरोधी नगरसेवकांनी सर्वानुमते मंजुरी दिली. शहर न्यायालयासमोरील विद्यमान पुतळ्याच्या जागी पुतळा पार्क येथे हा भव्य पुतळा उभारण्यात येणार असून, आवश्यक शासन परवानग्या घेऊन पुढील प्रक्रिया राबवली जाणार आहे.

सदर पुतळा 'राज-विजय क्रीडा, सांस्कृतिक व शैक्षणिक मंडळ' यांच्या वतीने स्वखर्चातून उभारुन लोकार्पण करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. हा विषय मंजुरीनंतर प्रेक्षक गॅलरीतून आंबेडकरप्रेमी जनतेकडून सभागृहात नगरसेवकांवर पुष्पवृष्टी करुन घोषणाबाजी करण्यात आली. कै. भाऊसाहेब झाडबुके सभागृहात पार पडलेल्या या सभेचे अध्यक्षस्थान नगराध्यक्षा तेजस्विनी कथले



यांनी भूषवले. मुख्याधिकारी तैमुर मुलाणी यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. सभेत एकूण २५ विषयांवर चर्चा झाली. पहिला विषय सर्वामताने मंजूर झाला असला, तरी इतर विषयांवर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तीव्र वाद, आरोप-प्रत्यारोप, गदारोळ पाहायला मिळाला.

**विकासात पक्षपातीपणा; विरोधकांचा आरोप**

विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे यांनी लातूर रोड परिसरात वारंवार निधी खर्च होत असल्याचा मुद्दा उपस्थित करत सत्ताधाऱ्यांवर पक्षपातीपणाचा आरोप केला. विरोधकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत आहे. नगराध्यक्ष आमच्या प्रश्नांना प्रतिसाद देत नाहीत. विकासासाठी आम्हीही मुख्यमंत्री देवाभाऊंकडे जाऊ शकतो, असे सूचक वक्तव्य त्यांनी सभागृहात केले.

विषय क्रमांक १३ वरील चर्चेत अक्कलकोटे यांनी एका कामाच्या अंदाजपत्रकात १ कोटी ४१ लाख रुपये मंजूर असताना तेच काम ६९ लाखांत पूर्ण कसे झाले, असा सवाल उपस्थित केला. जनतेच्या कररुपी पैशांचा वापर पारदर्शकपणे व्हावा,अशी मागणी त्यांनी केली. सभागृहाच्या पटलावरील चर्चांचे प्रोसिडिंग होत नसून, त्याबाबत प्रशासन उदासीन असल्याचाही आरोप त्यांनी केला. सत्ताधारी गटाचे विजय राऊत यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावत, बार्शी शहराचा समतोल विकास आमचा उद्देश आहे. मागील काळात सर्व प्रभागांत कोट्यवधींची कामे केली आहेत, असे स्पष्ट केले. तसेच पुढील पाच वर्षांत मोठ्या प्रमाणावर विकास कामे करण्याचे आश्वासन दिले.

विरोधकांना त्यांच्या सत्ता काळातील कारभाराची आठवण करुन देताना राऊत म्हणाले की, विरोधक म्हणून आम्हींसुद्धा विकासासाठी नगरपरिषदेच्या पायऱ्यांवर वेळोवेळी आंदोलन केले आहे. विषय क्रमांक ११, १३, १४ व १६ वर मतदानावेळी विरोधकांनी विरोध नोंदवला. यावेळी दोन्ही बाजूंमध्ये जोरदार शाब्दिक चकमक झाली. अनेकवेळा सभागृहातील वातावरण तणावपूर्ण व गंभीर झाले. सभेदरम्यान नगरसेवक कृष्णराज बारबोले हे बोलण्यासाठी उभे राहिल्यावर सत्ताधारी नगरसेवकांकडून त्यांना वारंवार अडविण्यात आल्याचे चित्र पाहायला मिळाले. या प्रकारामुळे सभागृहाची प्रतिमा मलिन झाल्याची चर्चा रंगली.

नगरसेविका विद्या बंगाळे व सरस्वती भानवसे यांनी कचरा डेपोवरील पूर्वीच्या खर्चाचा तपशील न देता नव्या खर्चावर आक्षेप घेतला. यावेळी विद्या बंगाळे यांनी या प्रकरणी उपोषणाचा इशाराही दिला.

सभेतील सर्वानुमते घेतलेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा निर्णय महत्त्वाचा ठरला असला, तरी इतर विषयांवर झालेल्या गदारोळामुळे बार्शी नगरपरिषदेतील राजकीय वातावरण तापल्याचे स्पष्ट झाले. आजच्या सभेतील चर्चेत उपनगराध्यक्ष रोहित पाटील संदेश काकडे, अमोल चव्हाण, भारत पवार, नवनाथ माळगे, विद्या बंगाळे, सरस्वती भानवसे, क्षमा रिकीबे, चांगुना जाधव यांनी सहभाग घेतला.